
डॉ. अभय बंग

# माणसांच्या शोधात पाकिस्तान


१४ ऑगस्ट हा आपल्या दृष्टीने भारताच्या फाळणीचा दुर्दैवी दिवस. तो पाकिस्तानचा स्वातंत्र्यदिन आहे. दोन दृष्टिकोनांत गंभीर दरी आहे. या वर्षी मी १४ ऑगस्टला पाकिस्तानात, तर १५ ऑगस्टला भारतात होतो. हा योग अर्थपूर्ण होता. त्यामुळे वास्तव दोन्ही बाजूंनी समजण्यास मला मदत झाली. आपला दृष्टिकोन तर आपल्याला माहीतच असतो. तो आपलाच असल्याने आपल्याला प्रियही असतो. त्याचीच हजारव्यांदा पुनरावृत्ती केल्याने केवळ पाठांतर होते. पण दुसऱ्याचा दृष्टिकोन समजून घेतल्याने कदाचित आपल्या समजुतीत गुणात्मक वाढ होईल. दृष्टी समतोल होईल.

८ ते १४ ऑगस्ट या दरम्यान एक आठवडा मी पाकिस्तानात होतो. या काळात जो वेगळा दृष्टिकोन मला दिसला, कळला, तो महाराष्ट्रातील लोकांपर्यंत पोचवावं असं मला वाटलं. शिवाय डॉ. शम्स कासिम-लाखा यांनी तुम्हाला सांगण्यासाठी निरोप पाठवला आहे. तोही पोचवणं आवश्यक आहे.



जिनांची समाधी (कराची)

पाकिस्तानात जाण्याचं निमित्त कुपोषण व बालमृत्यू होतं. या दोन्ही समस्या भारतात आहेत तशा पाकिस्तानातही आहेत. पाकिस्तानात कुपोषण कमी, पण बालमृत्यू समस्या जास्त गंभीर आहे. तिथे दर वर्षी जवळपास पाच लक्ष बालमृत्यू होतात. ते प्रमाण कमी कसं करावं हा त्यांच्यासमोरदेखील महत्त्वाचा प्रश्न आहे. त्या निमित्तानं पाकिस्तानचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बालरोगतज्ज्ञ प्रो. झुल्फिकार भुट्टा यांनी मला निमंत्रण पाठवलं. गडचिरोलीतील बालमृत्यू कमी करण्याच्या प्रयोगांमध्ये पाकिस्तानच्या बालमृत्यू प्रश्नाचं उत्तर सापडेल अशी त्यांना आशा वाटत होती. ही नवी पद्धत पाकिस्तानमध्ये समजून देण्यासाठी तिथल्या बालरोगतज्ज्ञांच्या राष्ट्रीय संमेलनात मी व्याख्यान द्यावं, तसेच एक कोटी लोकसंख्येतील नवजात मृत्यू व बालमृत्यू कमी करण्याच्या 'पैमान' या नव्या शासकीय-गैरशासकीय संयुक्त प्रकल्पाच्या आखणीत त्यांना मदत करावी, अशी ही विनंती होती. लहान मुले- मग ती कुठलीही असोत व कुणाचीही असोत- मरणं हे दुःखदच. बाल्य कुठलंही असो, हसत रहावं. म्हणून मी पाकिस्तानात गेलो. पण पाकिस्तानातील बालमृत्यूंबाबत लिहिण्याचा माझा विचार नाही.



मीनार-ए-पाकिस्तान

**१४ ऑगस्टला पाकिस्तानच्या स्वातंत्र्यदिनी मी कराचीत होतो. भारत पाकिस्तान या दोन देशांचे टोकाचे विरोधी दृष्टिकोन आणि त्याच वेळी ऐतिहासिक, सांस्कृतिक भरपूर साम्य, या पार्श्वभूमीवर तिथल्या आठवडाभराच्या वास्तव्यात खूप काही अनुभवायला मिळालं. दोन्ही बाजूनं वास्तव समजायला मदत झाली. तिथल्या मवाळ, सहिष्णू मुस्लिमांशी बोलता आलं. तिथला सर्वसामान्य मुसलमान हा आपल्याकडच्या साध्याभोळ्या माणसासारखाच आहे. भारतीय मुस्लिमांमधलाही असा साधा भोळा सगुण-साकार माणूस शोधायला हवा.**

## स्वातंत्र्य कुणापासून?

लाहोरला माझे यजमान, पाकिस्तानच्या बालरोगतज्ज्ञ राष्ट्रीय संघटनेचे अध्यक्ष डॉ. साजिद मकबूल हे होते. डॉ. साजिद व त्यांच्या पत्नी तस्मीन हे अतिशय सुसंस्कृत व स्नेहशील जोडपं आहे. पाहुण्यांची मेहमानवाजी करणं हा त्यांचा लाहौरी सभ्यतेचा खास गुण. त्यांनी मोठ्या कौतुकानं मला लाहोरचा 'मीनार-ए-पाकिस्तान' दाखवण्याची व्यवस्था केली. पाकिस्तानच्या स्वातंत्र्यानिमित्त बांधलेला हा प्रचंड जयस्तंभ आहे. त्यावर चहूबाजूंनी संगमरवरी दगडांवर पाकिस्तानच्या स्वातंत्र्ययुद्धातील प्रमुख घटना व घोषणा कोरलेल्या आहेत. ही स्वातंत्र्ययुद्धाची कहाणी १८५७ पासून सुरू होत नाही. ती खिलाफत चळवळ किंवा १९२० पासून सुरू होत नाही. ती खिलाफत चळवळ किंवा १९२० च्या असहकार आंदोलनापासूनही सुरू होत नाही. १९४० मध्ये लाहोरला कैद-ए-आझम जिनांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात पारित 'लाहोर-प्रस्ताव'पासून ती सुरू होते. या प्रस्तावात पहिल्यांदा मुस्लिम लीगनं स्वतंत्र पाकिस्तानची मागणी अधिकृतरीत्या केली होती. पाकिस्तानी जनतेच्या नजरेतून त्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाची कहाणी तिथून सुरू होते. याचं कारण, स्वातंत्र्य कुणापासून याबाबत त्यांच्या दृष्टिकोनात वसलेलं आहे. स्टीफन कोहेन यांच्या 'The idea of Pakistan' या पुस्तकात या दृष्टिकोनाचा इतिहास व परिणाम विस्तृतपणे मांडलेले आहेत.

पाकिस्तानी माणसाच्या नजरेतून त्यांना दुहेरी स्वातंत्र्य मिळवावं

लागलं. एक, इंग्रजांपासून. हिंदुस्तानवर असलेले मुघल साम्राज्य इंग्रजांनी बळकावलं होतं. मुस्लिमांना इंग्रजी अमलापासून स्वातंत्र्य मिळविणं आवश्यक होतं. मुस्लिमांना असं वाटतं, की चलाख इंग्रजांनी मुस्लिमांना कायमचं नामोहरम करण्यासाठी मतदानावर आधारित लोकशाहीची चाल खेळली. त्यामुळे स्वतंत्र हिंदुस्तानात राज्य नेहमीच बहुसंख्य हिंदूंचं होणार. मुस्लिम कायमचे सत्ताविहीन व दडपलेले राहणार. इंग्रज गेल्यावर सवर्ण हिंदूंच्या 'तावडीत' सापडण्याची जशी आंबेडकरांना आशंका होती, तशीच ती मुस्लिमांनाही म्हणजे त्यांच्यातील उच्चवर्गीय मुस्लिम नेतृत्वाला होती. मीनारे पाकिस्तानवर कोरलेल्या इतिहासातून त्यांचा दृष्टिकोन कळतो. कैद-ए-आझम जिनांनी प्रचंड संघर्ष करून मुस्लिमांसाठी स्वतंत्र पाकिस्तान मिळवला व स्वतंत्र भारतात हिंदूंच्या काँग्रेस पक्षाच्या व मोहनदास गांधी आणि जवाहरलाल नेहरू या हिंदू नेत्यांच्या वर्चस्वाखाली राहण्याच्या शिक्षेपासून मुक्ती मिळवून दिली. "



गांधार कला- उपवासी बुद्ध

मला आजवर एकच लाहोर प्रस्ताव माहीत होता. १९२८ मध्ये लाहोरला भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात जवाहरलाल नेहरूंच्या तरुण नेतृत्वाखाली संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी पहिल्यांदा करण्यात आली. रावी नदीच्या किनारी ही स्वातंत्र्याच्या संकल्पाची घोषणा झाली, हेच मी लहानपणापासून ऐकत-वाचत आलो होतो. पण इथं त्या लाहोर प्रस्तावाला अजून एक स्पर्धक होता. नव्हे, १९४० चा लाहोर प्रस्तावच तेवढा त्यांना माहीत होता. नेहरूंच्या अध्यक्षतेखालील संपूर्ण स्वराज्याच्या लाहोर प्रस्तावाविषयी मी हळूच विचारलं. असा प्रस्ताव झाला होता हेच लाहोरमधील सामान्य पाकिस्तानी नागरिकांना माहीत नव्हतं.

स्वातंत्र्य कुणापासून व स्वातंत्र्याची लढाई कुणाविरुद्ध, याबाबत आपला व त्यांचा दृष्टिकोन वेगळा आहे. महानायक वेगळे आहेत. जिना येथे खलनायक आहेत. तिथे गांधी. महात्मा गांधी हे हिंदूंचे नेते होते व भारताची फाळणी करून मुस्लिमांना वेगळा पाकिस्तान द्यायला मुख्य विरोध त्यांचा होता, असा त्यांना राग आहे. १९४८ मध्ये गांधीजींचे बलिदान होऊनही त्यांच्याविषयीचा गैरसमज पाकिस्तानमध्ये निवळलेला नाही.

कराची विद्यापीठात माझ्या भाषणापूर्वी माझा परिचय एक महिला डॉक्टर करून देणार होत्या. त्यासाठी त्या मला आवश्यक माहिती विचारत होत्या. माझं बालपण गांधीजींच्या आश्रमात गेल्याचा व महात्मा गांधींचे विचारही आमच्या कामाची महत्त्वाची प्रेरणा असल्याचं मी त्यांना सांगितलं. शेवटी मला त्या म्हणाल्या, "तो महात्मा गांधींचा उल्लेख वगळला तर नाही का चालणार ? "

" का? माझ्यासाठी तर ती गौरवाची बाब आहे. "

" पण इथले लोक ते समजू शकणार नाहीत. "

तिची विनंती मी मान्य केली नाही. खरं म्हणजे त्या वेळी मी ती समजूही शकलो नाही.

आता मला हळूहळू त्यामागची मनोभूमिका समजते आहे. पटत नाही. मान्यही नाही. पण निदान समजते.

## लॉस्ट अँड फाऊंड

या टोकाच्या विरोधी दृष्टिकोनांच्या पार्श्वभूमीवर भारतासोबत पाकिस्तानचे ऐतिहासिक व सांस्कृतिक साम्य बघण्यासारखं आहे.

लाहोर म्युझियममध्ये व पाकिस्तानात सर्वत्र या संयुक्त इतिहासाचे दाखले आढळतात. सिंधु नदी व सिंधू संस्कृतीचे अवशेष तिथे, पण या 'सिंधू'चे अपभ्रंश होऊन तयार झालेली 'हिंदू' व 'इंडिया' इथे. आर्यांचा काळ, महाभारताचा काळ (गांधारी अफगाणिस्तानची होती), अलेक्झांडरच्या आक्रमणाला पोरसचं उत्तर, मौर्य साम्राज्य हा आपला दोघांचा इतिहास एकच आहे. आज पाकिस्तान असलेल्या भागात एके काळी बौद्ध धर्म व्यापक पसरला होता. पेशावर आणि अफगाणिस्तानात 'गांधार कला' नावाची अप्रतिम कला विकसित झाली. त्यातील अनेक मूर्ती भगवान बुद्धांच्या जीवनावर आधारित आहेत. मोक्षाच्या शोधात तप करून कृश झालेल्या व दाढी वाढलेल्या बुद्धाची अप्रतिम मूर्ती हा गांधार कलेचाच एक नमुना. बुद्धाचा जगातला सर्वांत उंच उभा पुतळा अफगाणिस्तानात बामियानला होता. मुस्लिम पाकिस्तान व अतिरेकी अफगाणिस्तानात भगवान बुद्धाचे पुतळे? आपल्याला कससंच वाटतं. पण ते वाटणं इतिहासाच्या गेल्या पन्नास-साठ वर्षांच्या छोट्या तुकड्यांवर आधारित असतं.

'लाहोर किला' हा जणू दिल्लीच्या लाल किल्ल्याचा जुळा भाऊ. दिल्लीतल्या जामा मस्जिदप्रमाणेच तिथं बादशाही मस्जिद. (आणि समोरच शिखांचा मोठा गुरुद्वारा!) लाहोर किला अकबर व शहाजहाँच्या देखरेखीखाली बांधला गेला. अकबराचे जन्मस्थान पाकिस्तानात आहे, एवढेच नव्हे तर अकबर बादशहा नऊ वर्षे लाहोरलाच तळ ठोकून बसला होता. मुघले-आझम चित्रपटाने गाजवलेला शीशमहल मूळतः लाहोर किल्ल्यात पाहिला. अकबर-

सलीम-अनारकलीची कथा लाहोरला घडली असावी. त्या शोकांतिकेची आठवण देणारी 'अनारकली बाजार' नावाची बाजारपेठच लाहोरला आहे. मुघल साम्राज्याचा एक पाया दिल्लीत व दुसरा लाहोरमध्ये होता.

कराचीचा कापड उद्योग प्रसिद्ध आहे. सर्व प्रवासी कराचीहून बॅगा भरून कपडे आणतात. मी कुतूहल म्हणून कापड मार्केटला भेट दिली. भारतातून आलो कळल्याबरोबर दुकानदार म्हणाला, "आप इंडियासे आये हमारे मेहमान है। आपको हर चीज डिस्काऊंटमे देंगे।" पण मी खादी घालत असल्याने अन्य कपडे खरेदी करत नाही असं म्हणालो. त्यावर तो पटकन म्हणाला, "तुम्हाला खद्दी दाखवतो." आश्चर्य! पाकिस्तानमध्ये खादी? तो व्यापारीही अचंब्याने उद्गारला, "अच्छा, आपके यहाँ भी खादी है?"


बादशाही मस्जिद,लाहोर

हाताने विणलेल्या वस्त्राला सिंध प्रांतात खादी म्हणतात. ते तिथलं पारंपरिक वस्त्र आहे. कदाचित खादी हा शब्द गांधीजींनी सिंध-गुजरातच्या परंपरेतूनच घेतला असावा.

एकत्र संस्कृती हजारो वर्षांची आहे. वेगळेपणाचा इतिहास केवळ गेल्या ५०-६० वर्षांचा आहे. पण तोदेखील सरमिसळ झालेला. अगदी आजच्या काळातले, आपले दिलीपकुमार व राज कपूर, इंद्रकुमार गुजराल, मनमोहनसिंग आणि अडवानी, सर्वांचा जन्म पाकिस्तानमध्ये. आणि परवेझ मुशर्रफ यांचा जन्म भारतातला. दोन भाऊ लहानपणी वेगळे व्हावे व नंतर अनेक वर्षांनी भेटावे, या बॉलिवूडच्या 'लॉस्ट अँड फाऊंड' फॉर्म्युल्याप्रमाणे पाकिस्तानच्या रूपात आपल्याला अचानक लहानपणी हरवलेला नातेवाईक भेटतो.

## भारत : शत्रू की मित्र?


भारतासोबत त्यांचं नातं भीती आणि आपुलकी असं दुहेरी आहे. भीती भारताद्वारे गिळंकृत होण्याची आहे. भारताचे लष्कर, प्रचंड लोकसंख्या आणि सर्वांना पोटात सामावून घेण्याची अचाट शक्ती असलेली जादूई संस्कृती या तिघांची त्यांना भीती वाटते. बेनझीर भुट्टोंची केस सुप्रीम कोर्टात लढणारे व लोकशाही अधिकारांसाठी बराच काळ पाकिस्तानी तुरुंगात राहिलेल्या अैतिजाज अहसान यांनी The Indus Saga नावाचं पुस्तक लिहिलेलं आहे. सिंधू प्रदेश हा नेहमीच भारतापासून वेगळ्या अस्मितेचा होता हे सिद्ध करण्याची पूर्ण पुस्तकात धडपड दिसते. कारण मुख्य भीती ही, की " Will Pakistan and its people revert, one day to India?"

मोठ्या प्रयत्नांनी, भांडून त्यांनी पाकिस्तानच्या रूपात वेगळं घर मांडलेलं आहे. ते वेगळेपण टिकवून ठेवणं, ठळकपणे दाखवून देणं या त्यांच्या भावनिक गरजा आहेत. कौटुंबिक विभाजनानंतर कोणत्याही विभक्त कुटुंबात असाव्या तशा. भारतासोबत झालेली तीन सैनिकी युद्धं व भारताच्या मदतीमुळे झालेली बांगलादेशची निर्मिती यामुळे ही भीती व लष्करी तुल्यबळतेची चढाओढ पन्नास-साठ वर्षे कायम राहिली आहे.

लोकांच्या मनात युद्धाची भीती कायम ठेवणं ही पाकिस्तानी सैन्याची आवश्यकता आहे. अन्यथा वर्षानुवर्षे राष्ट्रीय बजेटचा ५० टक्के भाग सैन्यासाठी कसा मिळेल? १९४८ मध्ये काश्मीरवरून पहिलं युद्ध झाल्यावर १९४९ मध्ये पाकिस्तानच्या राष्ट्रीय अंदाजपत्रकातील ७० टक्के रक्कम सैन्यासाठी राखून ठेवण्यात आली. युद्ध-भीती-पैसा अशी ती सांगड आहे. पण सामान्य माणूस त्या ओझ्याखाली थकला आहे. प्रबुद्ध समाजवर्गाला हे जाणवतं, की हा पैसा विकासाकडे वळवला तर पाकिस्तानचा आर्थिक विकास करता येईल. शिक्षण वाढवता येईल. आरोग्यसेवा देता येतील. बालमृत्यू कमी करता येतील.

## स्वातंत्र्यदिनाचे दोन चेहरे

१४ ऑगस्टच्या पाकिस्तानच्या स्वातंत्र्यदिनाचे अजून दोन चेहरे माझ्या मनावर कोरले गेले आहेत. स्वातंत्र्यदिनाच्या अगोदर १०-१५ दिवसांपासून तिथे स्वातंत्र्यदिनाच्या स्वागताची पूर्वतयारी सुरू झाली. स्वातंत्र्य त्यांच्यासाठी अजून नूतन आहे. त्याचे अप्रूप व उत्साह शिल्लक आहे. घराघरावर झेंडे फडकायला लागले. वर्तमानपत्रात जिन्ना व इकबालची उद्धरणे, पाकिस्तानच्या ५८ वर्षांच्या इतिहासाचा आढावा, राजकीय नेत्यांची आवाहने झळकायला लागली. सुदैवाने यंदा त्याला भारतविरोधी धार नव्हती. मुख्य रोष (जिन्ना सोडून) पाकिस्तानच्या आजवरच्या दिवाळखोर व भ्रष्ट राजकीय नेतृत्वावर, जॉर्ज बुश व अमेरिकेवर आणि त्यांना सहकार्य देणाऱ्या परवेझ मुशर्रफ यांच्यावर होता. वातावरण जिहादी नव्हते. आवाहन



भारतात की पाकिस्तानात?

धर्मयुद्धाचे नव्हते. आनंद स्वातंत्र्याचा होता. आवाहन (यापुढे तरी) लोकशाही मार्गाने विकास करण्याचे होते. आणि गंमत म्हणजे या बाबतीत दाखला भारताचा दिला जात होता. भारतातील लोकशाही, शिक्षण, सामाजिक समानता व आर्थिक विकास हे आदर्श उदाहरण म्हणून पेश केले जात होते. इराण, इराक, अफगाणिस्तान किंवा सौदी अरेबियाचा आदर्श नव्हता. केवळ तुर्कीने आधुनिक मार्गाने विकास केल्याचा दाखला कधी कधी दिला जात होता. मुस्लिम राष्ट्रांमध्ये पाकिस्तानला रोल मॉडेल नाही, आदर्श उदाहरण नाही. त्यासाठी पाकिस्तानच्या सुबुद्ध विचारकांना व नागरिकांना भारतच उदाहरण म्हणून दिसतो. हा जणू नियतीने पाकिस्तानला शिकविलेला धडा.

स्वातंत्र्यदिनाचा दुसरा चेहरा कराचीला दिसला. १४ ऑगस्टला डॉ. झुल्फिकार भुट्टोंसोबत मी जिनांच्या समाधीकडे गेलो. पांढरीशुभ्र भव्य समाधी. कराचीत उठून दिसणारी. समाधीच्या प्रांगणात कराचीच्या गव्हर्नरांच्या हस्ते झेंडावंदन होत होते. प्रांगणात ३००-४०० माणसे सजूनधजून कार्यक्रमासाठी उभी होती. आणि साध्या वेशातली, हजारो फाटकी माणसे कंपाउंडच्या बाहेर रस्त्यांवर, प्रवेशद्वारासमोर झुंडीने उभी होती. त्यांना आत प्रवेश नव्हता. संगीनधारी सैनिकांद्वारे प्रवेशद्वार रक्षित होते.

असे म्हणतात, की ५०० लोकांच्या एका उच्चभ्रू गटाद्वारे १५ कोटी लोकसंख्येचे पाकिस्तान नियंत्रित केले जाते. या गटाला 'Establishment' असे सांकेतिक नाव आहे. त्यात मुख्यतः सैन्याधिकारी - वरिष्ठ नोकरशहा - जमीनदार - उद्योगपती हे येतात. काही संपादक, बुद्धिवंत, वकील, अर्थतज्ज्ञ, धार्मिक नेते त्यांना हातभार लावतात. बहुतेक राजकीय व आर्थिक या गटाद्वारे होतात. खरी सत्ता त्यांची. उरलेली जनता बाहेर रस्त्यावर.

## भारतीय माणसाविषयी भावना?

जगातल्या १५-२० देशांत आजवर गेलो. पण पाकिस्तानात जितका नैसर्गिक व सहज वावर करता आला, तितका एक नेपाळ सोडून, अन्य कुठेच करता आला नव्हता. कारण भाषेची सोय. ते उर्दू बोलतात. जुन्या हिंदी फिल्मच्या संवादात ऐकलेले उर्दू शब्द पेरत गेलं की आपली हिंदी ही बोलाचालीची उर्दू होते. रस्त्यावरच्या माणसाला समजते. तो जे बोलतो ते आपल्याला समजते. पाकिस्तानात माझा संपर्क मुख्यतः डॉक्टर्स व प्राध्यापक मंडळींसोबत आला. जिहादी मुस्लिम संघटनांना मी भेटायला गेलो नाही. माझ्या अनुभवाच्या या मर्यादा आहेत. पण या मर्यादेत भेटलेल्या पाकिस्तानी माणसांकडून काय अनुभवाला येतं ?

भारताविषयी भीती व स्पर्धा आहे. पण भारतीय माणसाविषयी? वरपासून खालपर्यंत सर्वच स्तरांत भारतीय माणसाविषयी आपुलकी जाणवते. हे काहीसं अनपेक्षित असतं. आपल्या मनात पाकिस्तान हे शत्रुराष्ट्र असतं. दोन देशांमध्ये शत्रुत्वाचा ५०-६० वर्षांचा इतिहास नक्कीच आहे. त्याला काही सबळ भौगोलिक, राजकीय व धर्मवादी कारणंदेखील आहेत. तो तत्काळ पुसला जाणार नाही. पण तिथल्या टॅक्सीवाल्याच्या शब्दात, 'पिछले दो-चार सालसे इंडिया-पाकिस्तान के बीच जो बडी अच्छी हवा बह रही है, ये फिजा बनी रहे!'

''भाई साहब, ये गोरे बरतानवी (ब्रिटिश) हमारे बीच लडाई लगाकर चल दिये। वे खुद तो गोरोंका इरोपियन युनियन बनाकर सुपर पावर बनना चाहते है। तो इंडिया-पाकिस्तान-बांगलादेश का युनियन बनाकर हम क्यों नहीं सुपर पावर बन सकते?''

गेल्या ५८ वर्षांच्या मूर्खपणापासून फारकत घेऊन आता भारतासोबत मैत्री करावी अशी सार्वत्रिक भावना आढळते. ती केवळ 'पब्लिक रिलेशन्स'ची योजित चाल नाही. व्यापक व स्वयंस्फूर्त आहे. कुठल्याही रस्त्यावर, दुकानात, वाहनात व माणसांत आढळते.

भारतीय टीव्ही चॅनल्स सर्वत्र सर्रास बघितले जातात. भारतीय सिनेमे आयात करण्यास अधिकृत बंदी असली तरी सी.डी. व डी.व्ही.डी.द्वारे बॉलिवूडने पाकिस्तान जिंकला आहे. पाकिस्तानचे लोकप्रिय नट कोण? याला उत्तर मिळालं- अमिताभ बच्चन व शाहरूख खान. एका दुकानाच्या दारावर ऐश्वर्या रायचा मोठा फोटो बघून मी आश्चर्य व्यक्त केलं तेव्हा माझ्या सोबतचा पाकिस्तानी तरुण म्हणाला, ''साहब, ऐश्वर्या की तसवीर तो आपको हर घरमें मिलेगी।'' कराचीचे डॉक्टर मला म्हणाले, ''सचिन तेंडुलकर पर तो सारी दुनियाही कुरबान है। लेकिन इस बार की टीम में वो आपका

नया बोलर था - बालाजी, उसपर कराची की पब्लिक फिदा थी।''

१४ ऑगस्टच्या त्यांच्या स्वातंत्र्यदिनी मी कराचीत होतो. औपचारिक कार्यक्रमपत्रिकेत नसतानाही आगाखान विद्यापीठातील स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात मी सहभागी झालो. झेंडा फडकल्यावर भाषण करताना विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. शम्स करीम-लाखा म्हणाले, ''आज हमारे लिये बडे खुशीकी बात है की इंडियासे आये मेहमान डॉ. अभय बंग हमारे बीच हाजिर है। वे कल लौट रहे हैं। उनके साथ मैं इंडियाके लोगोंको सलाम भेजता हूँ और १५ अगस्त के लिये पैगाम भेजता हूँ - आपको आझादी मुबारक!''

हजारांच्यावर लोकांच्या उपस्थित समूहाने टाळ्यांचा कडकडाट केला. त्यात प्राध्यापक, संशोधक, डॉक्टर मंडळी होतीच. पण विद्यापीठातील चपराशी, क्लर्क, कँटीनमधील मुलं, चौकीदार, खानसामे, ड्रायव्हर्स - सर्वच होते. माझं त्या कार्यक्रमाला येणं त्यांना अनपेक्षित होतं. म्हणून तो टाळ्यांचा कडकडाट नियोजित नव्हता, उत्स्फूर्त होता. तो पाकिस्तानी जनतेच्या मनाचा आरसा होता. लष्करी सेनापतींची आवाहने, राजकीय नेत्यांची बनेल वक्तव्ये, धार्मिक नेत्यांची जहरी भाषणे सर्व असूनही पाकिस्तानची जनता धर्मवेडी नाही. युद्धपिपासू नाही. ती मैत्रीच्या पैगामचं स्वागत करते.

## हिंदूंची स्थिती

अफगाणिस्तान सीमेजवळच्या क्वेट्टा शहरात गेलो होतो. पाकिस्तानात मांसाहार सर्रास चालतो. पाहुण्यांसाठी तर विशेषच सरबराई. मी शाकाहारी. माझी गैरसोय होऊ नये म्हणून डॉ. मकबूल यांनी क्वेट्टा शहरात त्यांचा एक जुना विद्यार्थी - डॉ. नरेश कुमार शोधून काढला. त्याला म्हणाले, ''डॉ. बंगांच्या शाकाहारी जेवणाची जबाबदारी तुझी. पण ते इथं असेपर्यंत मीदेखील त्यांच्यासोबत शाकाहारीच खाणार.''


डॉ. नरेश कुमारांसोबत फिरून मी क्वेट्टा शहर पाहिलं. अफगाण युद्धातील बातम्यांमध्ये ज्यांचे अनेक वेळा उल्लेख यायचे ती चमन, मस्टांग गावे अगदी जवळ आहेत. निर्वासित अफगाणांच्या वस्त्या पाहिल्या.

पाकिस्तानात हिंदूंची स्थिती कशी आहे? पाकिस्तानातील तीन शहरांत क्वेट्टा, ठठ्ठा व कराचीत मला भेटलेल्या तीन हिंदू डॉक्टरांसोबत मी याची चर्चा केली. पाकिस्तान हे मुस्लिम राष्ट्र आहे. राष्ट्रनिर्मितीचा त्यांचा आधारच धर्म आहे. अन्य धर्माची माणसं राष्ट्रपती, पंतप्रधान होऊ शकत नाहीत. पण सरकार इस्लामिक नाही. पाच-दहा टक्के कट्टरवादी मुस्लिम धर्मगुरू, जिहादी संघटना किंवा त्यांचे नेते व अनुयायी सोडले तर (तसे भारतातही त्रिशूलधारी हिंदुत्ववादी व नरेंद्र मोदी आहेतच) पाकिस्तानातली बहुसंख्य जनता ही धार्मिक पण मवाळ सहिष्णू आहे. (हे चित्रदेखील भारतासारखंच.) बहुसंख्य लोकांची मुस्लिम धार्मिक श्रद्धा ही कट्टरवादी नसून सूफी संतांच्या प्रभावाखालील आहे. ''आम्ही हिंदू इथं सर्वांसारखंच मोकळेपणाने राहतो. निर्भयपणे मंदिरात जातो.'' क्वेट्टा व ठठ्ठात मी मंदिरं पाहिलीत. लाहोरमध्ये गुरुद्वारा. सर्वच सुस्थितीत.

''आम्हाला भीती केव्हा निर्माण होते? भारतात अयोध्येची मस्जीद पाडली किंवा गुजरातमध्ये मुस्लिमविरोधी दंगे झाले तेव्हा. त्या वेळेस इथे हिंदूविरोधी रागाची भावना निर्माण होते. काही काळ भीती वाटते. मग पुन्हा पूर्वीसारखे सुरळीत.'' डॉ. नरेश कुमार.

## मुस्लिम माणूस

माझ्या मनात विचार आला- पाकिस्तानच्या निर्मितीचे मूळ भारतीय उपखंडातील मुस्लिमांच्या मनातील हिंदूंच्या बहुसंख्येबाबत भीती हे आहे. मुस्लिम राज्याच्या पूर्वेतिहासामुळे हिंदूंनादेखील मुस्लिमांबाबत तशीच भीती होती. दोन्ही भीतींना




सगुण साकार माणूस

काही ऐतिहासिक व धार्मिक कारणांचा आधार होता. पण भीती ही स्वभावतःच अफवेसारखी असते. स्वतःच वाढते. शिवाय दोन्ही बाजूंच्या भीतींची वजाबाकी न होता गुणाकार होतो. या भीतीला खतपाणी देणारे व द्वेष वाढवणारे दोन्हीकडचे कडवे हे वस्तुतः

पाकिस्तान निर्मितीला हातभार लावत असतात. भीती व द्वेष कायम झाले की पाकिस्तान निर्मिती ही घटना मग पाकिस्तान समस्या बनते.

पाकिस्तानशी भांडून, लढून पाकिस्तान समस्या सुटणार नाही. उलट वाढेल. हे मानसशास्त्रीय गणित स्पष्ट आहे. पाकिस्तान समस्या सुटण्यासाठी (पाकिस्तानच्या नजरेतल्या 'हिंदुस्तान' समस्येलाही हे तेवढेच लागू आहे) 'पाकिस्तान-हिंदुस्तान मानस' ही समस्या सोडवावी लागेल. भीती व दुरी वाढविण्याऐवजी कमी करावी लागेल.



कुपोषण,बालमृत्यू आणि दुःख दोन्हीकडे सारखेच!

पाकिस्तानातल्या माझ्या छोट्या वास्तव्यात मला जिहादी अतिरेकी दिसले नाहीत. हातात सुरे घेऊन फिरणारे, लुंगी घातलेले दाढीवाले मुसलमान गुंड दिसले नाहीत. मुसलमान व पाकिस्तानविषयी रंगविण्यात येणारे चित्र काही आढळले नाही. तिथला सर्वसामान्य मुसलमान हा आपल्याकडच्या साध्याभोळ्या माणसासारखाच. जगण्यासाठी धडपडणारा, कुटुंबवत्सल. मागची पार्श्वभूमी फक्त बदलते. पण समोर उभं कुटुंब अगदी तसंच! पण कोट्यवधींच्या अशा रीतीनं जगण्यात बातमीदायक काही नसतं. विकृत किंवा अतिरेकी घटनांचीच बातमी होत असल्यानं व इथं आपल्यापर्यंत फक्त बातम्याच पोचत असल्याने पाकिस्तानचे एक विकृत चित्र आपल्या मनात निर्माण झालेलं असतं. आपल्याकडच्याही सनसनाटी बातम्याच तिकडे पोचत असाव्यात.

बातमी नव्हे, माणूस पोचला पाहिजे. भारत व पाकिस्तानच्या माणसांची माणूस म्हणून भेट झाली पाहिजे. तशी झाली की आयुष्यभर संघस्वयंसेवक राहिलेल्या वाजपेयी व अडवानींचाही दृष्टिकोन बदलायला लागतो.

पाकिस्तानी माणसांशिवाय अजून तिथे मला कोण भेटलं ?

भारतातून पाकिस्तानात जाताना दिल्ली-लाहोर विमानात माझ्यासोबत बहुसंख्य प्रवासी ही मुस्लिम तरुण मुलं- खालच्या स्तरातली, अर्धशिक्षित, घामट वास असलेली. कोणत्याही विमानात घामाचा इतका वास मी आजवर अनुभवला नव्हता. ''इतकी तरुण मुलं पाकिस्तानात कशाला चाललीत? अतिरेकी प्रशिक्षणासाठी तर नव्हे?'' माझ्या मनात पाल चुकचुकली.

मी लाहोरला उतरलो. ते उतरले नाहीत. विमान पुढे आखाती देशात जात होतं. उच्च शिक्षण नसलेली ही तरुण मुसलमान मुलं रोजगाराच्या शोधात, समृद्धीच्या शोधात निघाली होती. मुंबई-पुण्याची शिक्षित मराठी मुलं डॉक्टर, इंजिनिअर बनून अमेरिकेला जातात. ही घामट मुलं कारागीर म्हणून आखाती देशात निघाली होती. हा सामान्य भारतीय मुस्लिम तरुणाचा चेहरा होता.

शाहरुख खान किंवा अमीर खान, अझीम प्रेमजी किंवा पतौडीचे नवाब हा भारतीय मुस्लिमाचा प्रातिनिधिक चेहरा नाही. तसले सधन, उच्चशिक्षित मुस्लिम हे अल्पसंख्येत आहेत. भारतातला सामान्य मुसलमान हा जमीनजुमला नसलेला, उच्च शिक्षण व उच्चभ्रू व्यवसाय नसलेला असा आहे. तो ड्रायव्हर, मेकॅनिक, कारागीर, छत्री दुरुस्त करणारा, पेंटर, विणकर, बांगडी विकणारा, मांस विकणारा असा आहे. त्याचे पोट त्याच्या हातावर आहे.

पण भारतात या मुसलमानाशी माझी भेट कुठं होते? माझ्या मित्रांमध्ये मुसलमान किती? प्रयत्नपूर्वक खूप आठवून पाहिलं तरी ३० वर्षांपूर्वी कॉलेजमधल्या दोन सहाध्यायींपलीकडे आठवता येत नाहीत. भारतातला मुस्लिम माझ्या जीवनाचा भागच नाही. त्याचं व माझं वर्तुळ कधी परस्परांना छेदच देत नाही.

भारतातल्या मुस्लिम समाजाविषयी माझ्या अज्ञानाचं भान मला पाकिस्तान यात्रेमुळे झालं.

भारताची पाकिस्तानशी मैत्री होणं ही लांबची व अनिश्चित बाब आहे. पण माझी मुसलमान माणसाशी भेट होणं ही महत्त्वाची बाब आहे. माझ्या हातातली आहे. तो सगुण, साकार माणूस आहे. तो पाकिस्तानातही आहे, भारतातही आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी, १९४७ मध्ये तो हरवला. त्याला आता शोधायला हवं.

■ डॉ. अभय बंग
सर्च, शोधग्राम,
गडचिरोली ४४२६०५